महाराष्ट्र वन विभाग

वन आणि वन्यजीव संरक्षण काळाची गरज

दुरध्वनी क्रमांक - २६५११९५९

E-mail-:dycfkop2007@gmail.com

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**उप वनसंरक्षक कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर यांचे कार्यालय**

*वनवर्धन* इमारत, पोस्ट ऑफीस समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर

---

जा.क्र.ब/नोसेल/४७६६/२०२३-२४.

कोल्हापूर, दिनांक :-२३/०२/२०२४.

प्रति,
श्री.मल्हार मिनरल्स, १०९ बी,
सिता कॉलनी, कोल्हापूर.

विषय - वनजमिन कोल्हापूर (क्षेत्र-४.४० हेक्टर)
वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत श्री.मल्हार मिनरल्स, कोल्हापूर यांनी मौ.घुंगुर ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर येथे लॅटेराईट खनिजाच्या उत्खननाकरीता ४.४० हेक्टर संरक्षित वनजमिन वळतेकरणाबाबत .

संदर्भ -
१. केंद्र शासन यांचेकडील पत्र क्र.FC-II/MH-१२५/२०१८- NGP/४८८० दि.०१.०२.२०१९
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र कक्ष-१७ /नोडल/आरएस/आयडी-१२५११(२५)/ २१४१/ २०१८-१९, दि. ११.०२.२०१९
३. या कार्यालयचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/२०१८-१९/७०६६ दि.१४.०३.२०१९
४. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/१९-२०/६१३१ दि२९/०१/२०२०.
५. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/२०२१-२२/२६७६दि.१६/१२/२०२०.
६. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/२०२१-२२/२८४६ दि.२/१२/२०२१.
७. केंद्र शासनाकडील पत्र क्र.५-३/२०११-FC (vol-I) दि.६.१.२०२२
८.केंद्र शासनाकडील पत्र क्र.५-३/२०११-FC (vol-I) दि.१९.१.२०२२
९. मा. प्रधान सचिव (वने), मुंबई यांची दि. १५-२-२०२४ रोजीची व्ही.सी.
१०. आपलेकडील पत्र दिनांक २०-०२-२०२४.

विषयांकित प्रकरणी, केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत श्री. मल्हार मिनरल्स, कोल्हापूर यांनी मौ. घुंगुर जंगल गट नं. ६८५ ता. शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथे लॅटेराईट खनिजाच्या उत्खननाकरीता ४.४० हेक्टर संरक्षित वनजमिन वळते करण्याच्या प्रस्तावास १ ते ३० अटींचे अधीन राहुन तत्वत: सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार केंद्र शासनाने तत्वत: मान्यता पत्रातील १ ते ३० अटींची पुर्तता करणेबाबत या कार्यालयाकडुन उपरोक्त संदर्भ क्र. ३ ते ५ अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार आपलेकडुन कोणत्याही अटींची पुर्तता अद्याप झालेली नाही. सदर १ ते ३० अटीमधील खालील अटींची रक्कम भरणा करणेसाठी संदर्भ क्रं. ६ अन्वये डिमांडनोट देवून parivesh.nic.in या वेबसाईटवरुन ई-चलनाव्दारे ॲड-हॉक-कॅम्पाच्या खात्यामध्ये रक्कम भरणा करुन चलन या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार आपलेकडुन वृक्षतोडीची रक्कम रु. ३६८७/- इतक्या रक्कमेचा

धनादेश या कार्यालयास देण्यात आलेले आहे. त्या वैतिरक्ति इतर रक्कमा व १ ते ३० अटींचा पुर्तता अहवाल अद्याप या कार्यालयास सादर करण्यात आलेला नाही.

केंद्र शासनाचे पत्र दि. ५.२.२००९ मधील Net Present Value (NPV) दरामध्ये केंद्र शासनाकडुन दि.६.१.२०२२ अन्वये सुधारित Net Present Value (NPV) दर निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार केंद्र शासनाकडील पत्र दि.१९.१.२०२२ अन्वये ज्या प्रस्तावास केंद्र शासनाकडुन तत्वत: मान्यता (Stage-I) प्राप्त झालेली आहे. त्याप्रमाणे तत्वत: मान्यता पत्रातील अटींची पुर्तता अद्याप प्रकल्प यंत्रणेकडुन झालेली नाही. त्या प्रस्तावाची Net Present Value (NPV) रक्कम केंद्र शासनाकडील दि.६.१.२०२२ रोजीच्या दराप्रमाणे भरणा करुन घेणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच पर्यायी वनीकरणाची रक्कम ही सन २०२२-२३ चे दराप्रमाणे भरणा करणे आवश्यक आहे.

त्यानुसार खालील तपशिलाप्रमाणे सुधारित डिमांडनोट देण्यात येत आहे. त्यानुसार सदर रक्कम parvesh.nic.in या वेबसाईटवरुन चलन अपडेट करुन चलनाची प्रिंट काढुन बँकेत आरटीजीएसव्दारे Ad-hoc CAMPA मध्ये भरणा केलेले चलन या कार्यालयास सादर करण्यात यावे.

| **अट क्र.** | **बाब** | **एकुण भरावयाची रक्कम (रुपयात)** | **भरणा केलेली रक्कम(रुपयात)** | **भरणा करावयाची प्रलंबित रक्कम (रुपयात)** |
|---|---|---|---|---|
| ii | पर्यायी वनीकरण रक्कम<br>सन २०२४-२५ चे दराप्रमाणे<br>( ४.४० हे x ८४५१२८ = ३७१८५६३/-) | ३७१८५६३.०० | ०.०० | ३७१८५६३.०० |
| vi | पर्यायी दिलेले जमिनीवर सर्वे डिमार्केशन व RCC पिलर्स उभारणे | ८६९२०.०० | ०.०० | ८६९२०.०० |
| vii | वर्तमान नक्त मुल्य (NPV)<br>(४.४० हे x ६७०१४०=२९४८६१६/-) | २९४८६१६.०० | ०.०० | २९४८६१६.०० |
| xxiv | कृत्रिम घरटे बसविणे ( ११० घरटे x रु.३०० प्रमाणे) | ३३०००.०० | ०.०० | ३३०००.०० |
| xxiii | ११ वृक्षतोडीची रक्कम | ३६८७.०० | ३६८७.०० | ०.०० |
| | **एकुण एकंदर** | **६७९०७८६.००** | **३६८७.००** | **६७८७०९९.००** |

वरील प्रमाणे रक्कमेचे चलन भरणा करुन या कार्यालयास सादर करण्यात यावे. तसेच निकृष्ठ जमीनीवर वनीकरण, इतरत्र निवडण्यासाठी, सुरक्षा क्षेत्राखालील दिडपट जागेबाबत या कार्यालयास कळविण्यात यावे, केंद्र शासनाचे प्रथम मान्यता पत्रातील १ ते ३० अटींची परिपुर्ण पुर्तता करुन पुर्तता अहवाल, हमीपत्र व आवश्यक दस्ताऐवजासह (इंग्रजी भाषेत) पाच प्रतीत या कार्यालयास सादर करण्यात यावे.

(जी गुरुप्रसाद)
उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वनविभाग कोल्हापूर

प्रतिलिपी- मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर यांना माहितीसाठी सविनय सादर.